| MHKO130013812023 | नियमित दिवाणी दावा क्र. १९१/२०२३<br><br>तुकाराम शिवराम आवटे उर्फ कांबळे इ. ०४ वि. गजानन मारुती मगदूम इ.०४ |
|---|---|

# निशाणी क्र. ०५ खालील आदेश.

**०१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९, नियम १ व २ व कलम १५१ अन्वये प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी दावा मिळकत विक्री अगर हस्तांतरण करु नये व वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस दाव्याच्या निकालापर्यंत हरकत अडथळा करु नये अशी अंतरिम तुर्तातूर्त मनाई मागण्याकरीता दाखल केला आहे.

**०२.** प्रस्तुतच्या अर्जास तसेच दाव्यास प्रतिवादी यांनी कैफियत व म्हणणे निशाणी क्र. १३ अन्वये दाखल केलेले आहे. वादीतर्फे नि.५ चे कामी साक्षीदार क्र. १ साताप्पा बाबूराव कांबळे व साक्षीदार क्र. २ साताप्पा हिंदूराव कांबळे यांचे प्रतिज्ञापत्र अनुक्रमे निशाणी क्र. १५ व १६ वर दाखल केले आहे. वादी यांनी स्वत:चे प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ नि.१७ वर दाखल केले आहे. तसेच वादीतर्फे लेखी युक्तीवाद नि.२४ वर दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज, लेखी युक्तीवाद, प्रतिवादी यांचे म्हणणे यांचे अवलोकन केले. अभिलेखावरील वादी व प्रतिवादी तर्फे दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

**०३.** वादींतर्फे विधिज्ञ श्री. एस.जी.शिंदे व प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. एस.एस.केस्तीकर यांचा युक्तीवाद ऐकला.

**०४.** अर्ज (नि. ५), म्हणणे (नि.१३), अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने खालील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसे सहित मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे:-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीस प्रथमदर्शनी केस आहे का ? | **...नाही.** |
| २. | सोईचा समतोल वादीच्या बाजूने आहे का ? | **...नाही.** |
| ३. | अर्ज नामंजूर केल्यास वादींना अपरिमित हानी होईल का ? | **...नाही.** |
| ४. | आदेश काय ? | **....अर्ज (नि.५) नामंजूर करण्यात येतो.** |

## - कारणमिमांसा -

### मुद्दा क्र. १ ते ३ -

०५. वरील सर्व मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्याने अर्जातील वस्तुस्थितीची पुनरावृत्ती टाळण्याकरीता, वरील तिन्ही मुद्यांचे विवेचन एकत्रितरित्या करण्यात येत आहे.

०६. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादीने प्रस्तुतचा दावा हा १) दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादीकडून काढून वादी यांना देणेबाबत आदेश मिळणेसाठी, २) दावा मिळकती वादीच्या कायदेशीर मालकीच्या असल्याचे हक्कज्ञापन होवून प्रतिवादी यांनी बोगस, बनावट कागदपत्रे केलेबाबतचे हक्कज्ञापन होवून दावा मिळकत वादीच्या कब्जेवहिवाटीस मिळणेबाबत, ३) दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश २०, नियम १२ प्रमाणे दरम्यानचे उत्पन्न ठरवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०७. प्रस्तुत अर्जान्वये वादीने प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी दावा मिळकती हस्तांतरण करु नये, वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस दाव्याच्या निकालापर्यंत हरकत, अडथळा करु नये अशी तुर्तातूर्त मनाई मिळण्याची विनंती केलेली आहे. वादीने प्रस्तुत अर्जामध्ये तसेच दाव्यामध्ये दावा मिळकतीचे वर्णन केलेले असून वादीच्या कथनानुसार, दावा मिळकत ही मुळची विठू देवनाक कांबळे यांची असून वादी हे विठू देवनाक कांबळे यांचे वारस असून केनवडे गावातील गट क्र. ५४५ ची जमीन विठू देवनाक कांबळे यांच्या नावे असून सदर जमीन वादीकडे आहे.

०८. वादीच्या कथनानुसार, दावा मिळकत ही प्रतिवादीचे पुर्वहक्कदार दादू हरी मगदूम यांना वादीचे पुर्वहक्कदारांकडून दि. २५/०५/१९६० रोजी करारपत्राने कसण्यासाठी रक्कम रु. १८००/- च्या मोबादल्यात दिली असून सदर जमीन चैत्र महिन्यात १९६८ साली विना हरकत परत देण्याचे ठरले असून सदर करार गोपाळ बाबू पाटील, श्रीपती नाना कांबळे यांचेसमक्ष लिहून सन १९६८ ला सदरचे करारपत्र संपुष्टात आले. परंतु, सदर उता-याच्या नोंदी कमी केलेल्या नसल्यामुळे तसेच राहिल्याने दादू मगदूम व विठू देवनाक कांबळे हे सन १९८० पुर्वी मयत झाले आहे. मयत दादू यांना कोणीही मुलबाळ नसून प्रतिवादीचे पुर्वहक्कदार मारुती यांनी दादूचे वारस नसताना वारस असलेबाबत खोटी माहिती देवून जमीनीच्या मालक सदरी वादीचे पुर्वहक्कदार यांचे नाव कमी करुन फेरफार नं. १७० ने त्यांचे नाव बेकायदेशीरपणे लावून घेतले. वादीने दाव्यातील कथनांच्या पुष्ठयर्थ दावा मिळकतीचे ७/१२ उतारे दाखल केले असून साक्षीदार साताप्पा बाबूराव कांबळे व साताप्पा हिंदूराव कांबळे, तुकाराम शिवराम आवटे यांचे प्रतिज्ञापत्र नि.१५ ते १७ अन्वये अभिलेखावर दाखल केलेले आहे. साताप्पा बाबूराव कांबळे, साताप्पा हिंदूराव कांबळे यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्राद्वारे (नि.१५ व नि.१६) मारुती मगदूम हा दादू यांचा मुलगा नसलेबाबत तसेच तो अगर मारुती सदर जमीनीमध्ये कुळ नसलेबाबत त्यांनी वादी अगर वादी यांचे पुर्वहक्कदार यांना खंड दिला नसलेबाबत तसेच कुळ हक्काबाबत केसेस

झाले नसलेबाबत कथन करुन प्रतिवादीचे पुर्वहक्कदार मारुती मगदूम यांनी बेकायदेशीररित्या वादीची जमीन ताब्यात ठेवलेबाबत व सदर जमीन विक्री करत असलेचा प्रयत्न करत असलेबाबत शपथेवर कथन केलेले दिसून येते.

**०९.** अभिलेखावरील वादीतर्फे दाखल दावा मिळकत गट क्र. ४३२ च्या ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सदर उता-यावर प्रतिवादींची नावे हे.०.०१.२७ आर इतक्या क्षेत्रास नमुद असून सदर उता-यावर प्रतिवादींच्या अनुषंगाने सामाईक क्षेत्र म्हणून नोंद आहे. तसेच, प्रतिवादी व्यतिरिक्त सदर गट नंबर मधील जवळपास ६० इतर सहहिस्सेदारांची नावे नमुद असून वादीच्या नावाचा कोणताही उल्लेख दिसून येत नाही. तसेच, दावा गट नं. ४३८, ४५१, ५०२ या मिळकतीच्या ७/१२ उता-यांवर प्रतिवादींच्या नावाची नोंद असून दावा गट नं. ५०३, ५४४, ६३६ या मिळकतीच्या ७/१२ उता-यावर प्रतिवादींसह इतर अन्य सहहिस्सेदारांची नावे नमुद असून सदर मिळकतीवर प्रतिवादींनी घेतलेल्या कर्जाच्या अनुषंगाने देखील नोंद असलेबाबत बोजा नोंद केलेला आहे. वादीने दाव्यातील कथनांच्या पुष्ठयर्थ दस्त क्र. १३४८/१९८२ हा दस्त अभिलेखात आढळून येत नसलेबाबत दुय्यम निबंधक श्रेणी-१ कागल यांनी दिलेल्या पत्राची प्रत, ए.एल.टी. केनवडे/४१/१९६१ केस चालून ३२-ग प्रमाणे झालेल्या खरेदीचा दि. ३०/०९/१९६८ चा आदेश आढळ होत नसलेबाबत किंवा आढळ होताच देण्याची व्यवस्था करणेबाबत तहसिलदार कागल यांचेकडून प्राप्त पत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे.

**१०.** प्रतिवादींतर्फे दाखल दावा गट नं. ४५१ चा सन १९८३-८४ ते १९९२-९३ च्या ७/१२ उता-यांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, विठू देवनाक कांबळे यांचे नाव कमी होवून दादू हरी मगदूम व त्यांचे नाव कमी होवून मारुती दादू मगदूम यांचे नाव कूळ कायदा कलम ४३ च्या अटीस पात्र राहून करण्यात आल्याचे दिसून येत असून सदर ७/१२ उता-यावर भोगवटदार सदरी मारुती दादू मगदूम यांचे नाव नमुद असून संरक्षित कूळ म्हणून मारुती दादू मगदूम यांच्या नावाचा उल्लेख दिसून येतो. दावा मिळकत गट नं. ४३८ च्या सन १९८३-८४ सालातील ७/१२ उता-या सदरी देखील मारुती दादू मगदूम यांचे नाव नमुद नसून संरक्षित कूळ म्हणून सदर नावाची नोंद असल्याचे दिसून येते. तसेच, प्रतिवादीने अभिलेखावर सर्व्हे नं. १४३ चे सन १९५६-५७ ते १९६५-६६, १९६६-६७ ते १९७५-७६ चे ७/१२ उतारे दाखल केलेले असून सदर जमीनीवर देखील संरक्षित कूळ म्हणून दादू हरी मगदूम यांच्यानंतर मारुती दादू मगदूम यांच्या नावाची संरक्षित कूळ म्हणून तसेच कुळ आणि खंड सदरी देखील नोंद असल्याचे दिसून येते. सर्व्हे नं. १०६ च्या ७/१२ उता-या सदरी देखील दादू हरी मगदूम यांची सन १९५६-५७ ते १९६५-६६ या कालावधीत संरक्षित कूळ म्हणून तसेच कुळ व खंड सदरी देखील दादू हरी मगदूम यांच्या नावाची नोंद दिसून येते.

**११.** अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादीतर्फे दाखल दावा गट नं. ४५१, ४३८, ५४४ चे ७/१२ उता-यांवर सन १९९३-९४ ते २००३-०४ या कालावधीत मारुती

दादू मगदूम यांचे नाव संरक्षित कूळ म्हणून नोंद असून त्यांनी घेतलेल्या कर्जाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक लि. मुंबई, शाखा कागल यांचा बोजा निर्माण केल्याच्या अनुषंगाने नोंद दिसून येते. दावा गट क्र. ४३२ चे सन १९८३-८४ ते १९९२-९३ या ७/१२ उता-यांचे अवलोकन केले असता मारुती दादू मगदूम यांचे नाव भोगवटादार सदरी नमुद असून दावा गट नं. ४३२ च्या सन १९९३-९४ ते २००३-०४ या कालावधीतील ७/१२ उता-या सदरी भोगवटदार म्हणून मारुती दादू मगदूम यांचे नाव नमुद असल्याचे दिसून येते.

**१२.** दावा मिळकत गट क्र. ५३० च्या सन १९८३-८४ ते १९९२-९३, १९९३-९४ ते २००३-०४ सालातील ७/१२ उता-यांवर देखील मारुती दादू मगदूम यांचेसह इतर अन्य सहहिस्सेदारांची नावे भोगवटदार सदरी नमुद असल्याचे दिसून येते. प्रतिवादींनी दादू हरी मगदूम यांच्या नावाची नोंद दावा मिळकतीस करण्यात आल्याने फेरफार नं. ७६० चा उतारा अभिलेखावर दाखल केलेला आहे. तसेच, अभिलेखावरील दाखल फेरफार नं. २८६ च्या उता-याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, दादू हरी मगदूम मयत झालेनंतर त्यांचे वारस म्हणून मारुती दादू मगदूम, रकमाबाई बापू पाटील, साऊबाई ज्ञानू मस्कर यांची नावे गट क्र. ५०२, ४३८, ५४४, ४५१ चे अभिलेख सदरी नोंद होणेबाबत वर्दी दिलेने दि. १८/११/१९८८ रोजी त्याअनुषंगाने वर्दी अर्ज प्रकरण मंजूर करण्यात आल्याचे दिसून येते. तसेच, अभिलेखावरील फेरफार नं. १७० च्या उता-याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, दि. १७/०७/१९८७ रोजी दावा मिळकत गट क्र. ४३८, ५४४, ४५१ या मिळकतींना सदर जमीनीचे खातेदार विठू देवनाक कांबळे व कूळ दादू हरी मगदूम यांचे मयत वारस मारुती दादू मगदूम यांचे दरम्यान अतिरिक्त तहसिलदार व ए.एल.टी. कागल यांचे कोर्टात नं. ए.एल.टी./केनवडे/४१/१९६१/दि.३०/०९/१९६८ ने केस चालून जमीन कुळास रक्कम रु. १९६८.२५ रुपयास खरेदी होवून दि. १३/०८/१९८२ रोजी रजिस्टर सेल सर्टीफिकेट वरुन कांबळे यांचे नाव कमी करुन दादू हरी मगदूम यांचे नाव इतर हक्कात कुळ कायदा कलम ४३ च्या अटीस पात्र अशी नोंद करुन दि. १७/०७/१९८७ साली सदर नोंद मंजूर करण्यात आल्याचे दिसून येते. सदर बाबीच्या अनुषंगाने प्रतिवादींनी सदर मिळकतीच्या ए.एल.टी./केनवडे/४१/१९६१/दि.३०/०९/१९६८ रोजीच्या दादू हरी मगदूम यांच्या नावे कलम ४३ अन्वये देण्यात आलेले प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे.

**१३.** वास्तविक पाहता, वादीने प्रस्तुतच्या दावा मिळकतीमध्ये व अर्जामध्ये दावा मिळकत दादू हरी मगदूम यांना कसण्यासाठी दि. २५/०५/१९६० रोजीच्या करारपत्रान्वये कसण्यासाठी दिल्याचे कथन केले असून सदरचे करारपत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. वास्तविक पाहता, वादीने, प्रस्तुत दावा अन्वये दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादीकडून काढून वादी यांना देणेबाबत मागणी केलेली असल्याने एकंदरीतच वादीने दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादीकडे असल्याचे प्रथमदर्शनी/सकृतदर्शनी दिसून येते. वास्तविक पाहता, वादीने

दि.२५/०५/१९६० चे करारपत्र अथवा सदरचे करारपत्र संपुष्टात आल्याच्या अनुषंगाने कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

१४. वास्तविक पाहता, अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सन १९६६-६७ सालापासून दावा मिळकतीस मारुती दादू मगदूम यांचे नाव भोगवटदार सदरी व संरक्षित कूळ म्हणून नमुद असून त्याअगोदर सन १९५६-५७ साली देखील त्यांचे पुर्वहक्कदार दादू हरी मगदूम यांचे नाव संरक्षित कूळ म्हणून नमुद असून दादू हरी मगदूम मयत झालेनंतर मारुती दादू मगदूम व इतर वारसांची नावे दावा मिळकतीमध्ये नमुद झाल्याचे दिसून येते. वास्तविक पाहता, फेरफार नं. १७० हा दि. १७/०७/१९८७ रोजी मंजूर करण्यात आल्याचे तसेच प्रमाणपत्र हे दि. १३/०८/१९८२ रोजी अतिरिक्त तहसिलदार, ए.एल.टी. कागल यांनी दिल्याचे अभिलेखावरील कागदपत्रांवरुन दिसून येते. त्याअनुषंगाने हरकत घेतलेबाबत अथवा तक्रार केलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा वादीने अभिलेखावर दाखल केलेला दिसून येत नाही. वास्तविक पाहता, दाव्यातील कथनांनुसार असे निदर्शनास येते की, वादीचे पुर्वहक्कदार यांनी सदर फेरफार नं. १७० च्या नोंदी रद्द करण्याच्या अनुषंगाने आर.टी.एस. अपिल मा. उपविभागीय अधिकारी कागल-राधानगरी यांचेकडे दाखल केले होते व सदरचे अपिल दि. २२/०८/२०२२ रोजी नामंजूर करण्यात येवून फेरफार नं. १७० च्या दि. १७/०७/१९८७ चा फेरफार कायम करण्यात आलेला आहे.

१५. उपरोक्त नमुद कारणमिमांसेचा विचार करता असे निदर्शनास येते की, वादींनी प्रथम व सकृतदर्शनी दावा मिळकतीमध्ये वादीची शांततामय कब्जेवहिवाट असलेबाबत तसेच प्रतिवादी सदर कब्जेवहिवाटीस हरकत, अडथळा करत असलेबाबत तसेच दावा मिळकत विक्री अगर हस्तांतरण करत असलेबाबत सकृतदर्शनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. दाव्यातील व अर्जातील कथनानुसार दावा मिळकती मध्ये प्रतिवादींचा कब्जा असल्याचे दिसून येते. सबब, वरील सर्व कारणास्तव वादीला प्रथमदर्शनी केस नसल्याने सोईचा समतोल वादीच्या बाजुने असल्याचे तसेच मनाई अर्ज नामंजूर केल्यास वादीला अपरिमित हानी होईल याबाबत वादीने सकृतदर्शनी कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ बाबतः-**

१६. मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविण्यात आलेले आहेत. त्यामुळे, अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. अर्जाची वस्तुस्थिती लक्षात घेता खर्चासंबंधी कोणताही आदेश पारित करणे उचित राहणार नाही. सबब, मुद्दा क्र. ४ च्या निष्कर्षाच्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः-

## - आ दे श -

१. अर्ज (निशाणी क्र. ०५) नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चासंबंधी कोणताही आदेश नाही.

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.04.07 16:17:43 +0900

कागल (श्रीमती प्रणिता सुहास पाटील)
दिनांक - ०७/०४/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.